**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अभ्यासाच्या शैलीवर विश्वास ठेवावा, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'परीक्षा पे चर्चा' मधून आवाहन

- विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- व्याजदर जैसे थे ठेवायचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, अवैध इलेक्ट्रॉनिक व्यवहारांमुळे नुकसान झालेल्या बँक ग्राहकांना २५ हजार रुपये भरपाई द्यायचा प्रस्ताव

- गडचिरोली जिल्ह्यातल्या नक्षलवादी कारवाईत ३ नक्षलवादी ठार, जखमी झालेल्या जवानाचा मृत्यू

**आणि**

- १९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताचा नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय

**<><><><><>**

प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या स्वतःच्या अध्ययन शैलीवर विश्वास ठेवावा असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज 'परीक्षा पे चर्चा' या संवादात्मक कार्यक्रमाच्या नवव्या आवृत्तीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि परीक्षेच्या काळात तणावातून मुक्त राहण्यासाठी मार्गदर्शन केलं. कोणत्याही दोन व्यक्ती एकसारखा विचार करू शकत नाहीत त्यामुळे प्रत्येकाला आपल्या तयारीवर पूर्ण विश्वास असला पाहिजे, असं ते म्हणाले. उद्दिष्टं ही महत्त्वाकांक्षी असावीत मात्र त्याचवेळी ती आवाक्यात असणंही महत्त्वाचं आहे, विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांच्या सूचनांकडे नीट लक्ष द्यावं, त्यावर विचार करावा आणि

स्वतःचे अनुभव आणि आकलन यांची सांगड घालून आत्मविश्वासानं परीक्षांना सामोरं जावं, असा सल्ला त्यांनी दिला.

शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गतीबद्दल संवेदनशील राहावं, असं प्रधानमंत्री म्हणाले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांपेक्षा फक्त एक पायरी वर असावं ज्यामुळे मार्गदर्शन करणं सोपं जाईल आणि ते भीतीदायक वाटणार नाही, असं त्यांनी सुचवलं. जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये संतुलन आवश्यक आहे, गुण किंवा कौशल्यं यापैकी कोणत्याही एका बाजूकडे जास्त झुकल्यानं असंतुलन निर्माण होऊ शकतं, योग्य अभ्यास, निरीक्षण आणि ज्ञानाचा वापर केल्याशिवाय कोणतंही कौशल्य मिळवता येत नाही यावर त्यांनी भर दिला.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

**<><><><><>**

विरोधकांच्या गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२पर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी हातात फलक घेऊन हौद्यात उतरून घोषणाबाजी करायला सुरुवात केली. देशाच्या मतदारांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी प्रतिनिधींना निवडून दिलं आहे, घोषणाबाजी करण्यासाठी नव्हे, असं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. विरोधी सदस्य, सदनाचा अपमान करत असून सध्या सुरू असलेल्या अधिवेशनात आत्तापर्यंत १९ तास, १३ मिनिटं वाया गेल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांनी सदस्यांना कामकाज चालू द्यायची विनंती केली आणि काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांचाही एक प्रश्न कामकाजात असल्याची माहिती दिली. तरीही गदारोळ सुरूच राहिल्यानं अवघ्या ४ मिनिटांत त्यांनी कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाजाला पुन्हा सुरूवात झाल्यानंतरही विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. गदारोळातच कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. अध्यक्षांनी पुन्हा विरोधकांना जागेवर

जाऊन बसायची विनंती केली, पण गोंधळ सुरूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत देशभरातल्या १७० रेल्वेस्थानकांच्या पुनर्निर्माणाचं काम पूर्ण झाल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यभेत प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. या योजनेअंतर्गत १ हजार ३०० रेल्वेस्थानकांचा कायापालट होणार असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं आज व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला. बुधवारपासून सुरू झालेल्या समितीच्या बैठकीतले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी-(१.२५ सेकंद)***

*(रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीनं रेपो आणि इतर दर जैसे थे ठेवण्याचा निर्णय आज जाहीर केला. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. डिसेंबर महिन्यात हा दर पाव टक्क्याने घटवण्यात आला होता. सोन्या-चांदीच्या दरात होत असलेल्या वाढीमुळं किरकोळ चलनवाढीचा दर आगामी आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत ४ टक्के राहील, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. यापूर्वी हा दर ३ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील असं रिझर्व्ह बँकेनं डिसेंबरमध्ये सांगितलं होतं. आता रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वृद्धी दराच्या अंदाजातही सुधारणा केली आहे. आगामी आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील असं रिझर्व्ह बँकेचं म्हणणं आहे. डिसेंबरमध्ये वर्तवलेल्या अंदाजात हा दर ६ पूर्णांक ७ टक्के राहील, असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं.*

*अवैध इलेक्ट्रॉनिक बँकिंग व्यवहारांमुळं ग्राहकांना होणाऱ्या नुकसानीवर मर्यादा आणण्यासाठी दिशानिर्देशांचा मसुदा रिझर्व्ह बँक जाहीर करणार आहे. त्यानुसार छोट्या रकमेच्या नुकसानीसाठी ग्राहकांना २५ हजार रुपयांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव आहे. ही नुकसानभरपाई प्रत्येक ग्राहकाला एकदाच दिली जाईल. याबद्दलचे तपशील लवकरच दिले जातील, अशी माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. तसंच ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यातून ऑनलाइन व्यवहार करताना खबरदारीचे अतिरिक्त उपाय लागू करण्याचाही बँकेचा विचार आहे. याशिवाय बँकांचे वसुली एजंट आणि दिशाभूल करून ग्राहकांना विकल्या जाणाऱ्या विविध वीमा आणि इतर योजनांच्या संदर्भात सुधारित दिशानिर्देशांचा मसुदाही रिझर्व्ह बँक लवकरच जाहीर करणार आहे.)*

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात सुरू असलेल्या नक्षलविरोधी कारवाईत आणखी २ नक्षलवादी ठार झाले आहेत, तर कारवाईदरम्यान जखमी

झालेल्या एका जवानाचा मृत्यू झाला आहे. ३ दिवसांपासून सुरू असलेल्या या कारवाईत आत्तापर्यंत ३ नक्षलवादी मारले गेले आहेत. यात एका महिलेचाही समावेश आहे. जखमी झालेल्या आणखी एका जवानाला हवाईमार्गे उपचारांसाठी भामरागडला नेलं आहे. महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवरच्या फोडेवाडा या गावाजवळ नक्षलवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई सुरू करण्यात आली होती. यात पोलिसांनी नक्षलवाद्यांचे २ तळ उद्ध्वस्त केले, तसंच आणखी कुमक मागवून घेतली. काल पोलिसांनी एक एके-४७ रायफल आणि एक स्वयंचलित रायफल जप्त केली होती. मृत नक्षलवाद्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

**<><><><><>**

मेघालयमध्ये कोळसा खाणीत काल झालेल्या स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या १८वर गेली असून अजूनही काही जण खाणीत अडकल्याची भीती आहे. खाणकामासाठी केल्या जाणाऱ्या शक्तिशाली स्फोटांमुळे बोगदा कोसळल्यानं ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज आहे. स्फोटाच्या तीव्रतेमुळे खाणीजवळच्या इमारती कोसळल्यानं बचाव कार्यात अडथळा येत असल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं. या ठिकाणी बेकायदेशीर खाणकाम चालत होतं आणि सरकारी आदेशाचं उल्लंघन केलं जात होतं, असं प्राथमिक चौकशीत आढळलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपयांचं तर जखमींना ५० हजार रुपयांचं अर्थसहाय्य जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि युरोपीय संघादरम्यान झालेला मुक्त व्यापार करार हा दोन्ही बाजूंसाठी एक मैलाचा दगड आहे, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर

एस. जयशंकर यांनी आज केलं. नवी दिल्ली इथं भारत-युरोपीय संघ मंचाच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. सुरक्षा, पर्यावरण, तंत्रज्ञान आणि प्रतिभा या क्षेत्रांमधली द्विपक्षीय बलस्थानं त्यांनी अधोरेखित केली. या मंचामुळे द्विपक्षीय संवादाला चालना मिळेल आणि हे संबंध आणखी बळकट होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत काल रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने दिल्ली कॅपिटल्सचा पराभव करून दुसऱ्यांदा या स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. गुजरातमधल्या वडोदरा इथं झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने निर्धारित २० षटकांत चार बाद २०३ धावा केल्या. रॉयल चॅलेंजर्सनं २०४ धावांचं लक्ष्य १९ षटकं आणि ४ चेंडूंमध्ये ४ खेळाडूंच्या मोबदल्यात पूर्ण केलं. स्मृती मंधानाला सामनावीर, तर गुजरात जायंट्सच्या सोफी डिव्हाइनला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आलं.

**<><><><><>**

बॅडमिंटन आशिया टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत गतविजेत्या भारतीय महिला संघाला चीनकडून ३-० असा पराभवाचा धक्का बसला. तर पुरुष संघाचा सामना आज संध्याकाळी दक्षिण कोरियाशी होणार आहे.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताची लढत इंग्लंडविरुद्ध सुरू आहे. झिंबाब्वेच्या हरारे इथं सुरु असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या सातव्या षटकांत १ गडी बाद ४७ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**